## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २४६९/२०२२

**अपिलार्थी, श्री.सदानंद एस. गणवीर**
अंबिका नगर, यवतमाळ ४४५ ००१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,
वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय बदलापुर,
स्टेशन रोड, बदलापूर (प.),जि.ठाणे ४२१ ५०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक वनसंरक्षक
(रराप व वन्य), ठाणे वनविभाग, ठाणे,
ता.जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२२ | -- | ०९.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने, आज पावेतो काहीच न कळविल्याने माहिती अप्राप्त असल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.गणेश सोनटक्के, सहाय्यक वनसंरक्षक (रराप व वन्य.) ठाणे उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय धारवणे, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय, बदलापूर उपस्थित आहेत.

*" माहे ०१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ पावेतो या महिन्यात आपल्या रेंज कार्यालयाने संबंधित उपवनसंरक्षक वनविभागाकडून शासनाच्या योजनेअंतर्गत कामाकरीता प्राप्त एकुण धनादेशावरील रकमेची माहिती तसेच प्राप्त एकुण धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची माहिती तसेच बिल व बिलाच्या व्हाऊचरसह छायाप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत.*

1) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकुण प्राप्त धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची सविस्तर माहिती व त्याचे बिल व बिलाचे व्हाऊचरची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्यात यावी.*
2) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत आपल्या रेंज कार्यालयाने उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकूण प्राप्त रकमेची माहिती/RTGS द्वारा एकूण प्राप्त रकमेची माहिती जसे RTGS चा नंबर त्यावरील रक्कम व त्याचा दिनांक व बँकेच्या नावाची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देयात यावी."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.०८.२०२२ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना १० दिवसात पुरविणेबाबत आदेश पारित केले होते. तथापि सदर आदेश देण्यापूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले होते की, त्यांनी मागणी केलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची असल्याने, सदर कागदपत्रे स्वत: समक्ष पाहून त्यापैकी आपणास आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांवर खूणा कराव्यात. त्यानुसार सदर रक्कमेवर प्रति पृष्ठ २ रु.शुल्क आकारुन चलनाने शासकीय भरणा करुन आपणास माहिती पुरविली जाईल.

मुळात अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची आहे किंवा कसे? हा मुद्दा या प्रकरणी महत्वाचा आहे. अपिलार्थी यांनी स्पष्ट शब्दामध्ये त्यांना हवी असलेली माहिती शब्दबध्द केलेली आहे. ती दि.०१ मार्च २०२२ ते दि.३१ मार्च २०२२ या कालावधीची आहे. या कालावधीमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी बदलापूर यांचे कार्यालयात उपवनसंरक्षक ठाणे यांचेकडून प्राप्त झालेल्या रक्कमा तसेच त्यांचेकडून झालेला खर्च, यासंबंधी कॅशबुक मधील नोंदी व व्हाऊचरच्या प्रती अशा माहितीची मागणी केली होती. ही माहिती व्यापक कशी आहे, याबाबत उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, ते हा

मुद्या स्पष्ट करु शकले नाहीत. त्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊनसुध्दा सदरची माहिती का देण्यात आली नाही हे देखिल विद्यमान जन माहिती अधिकारी सांगू शकले नाहीत. तथापि आपण आता माहिती देण्यास तयार आहोत, असे विधान त्यांनी केले आहे. याप्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद एस.ठाकूर व श्री.विवेक नातू, वनक्षेत्रपाल बदलापूर यांनी माहिती देण्यास जाणीवपूर्वक विलंब केला आहे असे, दिसून येते. प्रथमत: त्यांनी माहिती विस्तृत असल्याचे कारण सांगून त्यासाठी अपिलार्थी यांना प्रत्यक्ष कार्यालयात बोलावले. मात्र त्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती पुरविण्याचे आदेश दिल्यानंतरसुध्दा त्यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थी यांना माहिती न पुरविण्याचा उद्देश होता, असे प्रथम दर्शनी दिसून येत आहे.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद एस.ठाकूर व श्री.विवेक नातू, वनक्षेत्रपाल बदलापूर यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय धारवणे, वनक्षेत्रपाल बदलापूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय धारवणे, वनक्षेत्रपाल बदलापूर यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद एस.ठाकूर व श्री.विवेक नातू, वनक्षेत्रपाल बदलापूर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद एस.ठाकूर व श्री.विवेक नातू, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय बदलापुर, स्टेशन रोड, बदलापूर (प.),जि.ठाणे ४२१ ५०३.

**-यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय धारवणे,वनक्षेत्रपाल,
वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय बदलापुर,
स्टेशन रोड, बदलापूर (प.),जि.ठाणे ४२१ ५०३.

**यांचे मार्फत प्रत रवाना.**